**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५०/२०१६-१७/९२ दिनांक: १६.०३.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ५०/२०१६-२०१७**

१) श्री. दत्तू कुंडलीक यादव :
मु. पो. वायफळे
ता. जत, जिल्हा. सांगली

**तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ

**विरुध्द पक्षकार**

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग संख

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री दत्तू कुंडलीक यादव, रा. वायफळे, ता. जत. जि. सांगली यांनी सदरचे गा-हाणे घरगुती वीज जोडणी त्वरीत देणेत येऊन वितरण कंपनीने केलेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- भरपाई मिळणेसाठी दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) तक्रारदार हे मौजे वायफळे, जा. जत. जि. सांगली येथील रहिवाशी आहेत. त्यांनी घरगुती वीज जोडणी मिळणेसाठी वि.प. कडे अर्ज करुन दि. १०-०९-२०१३ रोजी रु. १५००/- भरणा केले होते. त्यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. परंतु वीज जोडणी मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी दिनांक २९-११-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनांक १७-०१-२०१७ रोजी आदेश करुन, तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत येईल असे कळविले. त्या आदेशावर नाराज होऊन तक्रारदार यांनी सदरचे अपिल दि. १९-०१-२०१७ रोजी या मंचासमोर दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

३) तक्रारदार यांना नविन घरगुती वीज जोडणी देण्यासाठी ०.२४ कि.मी. लघुदाब वाहिनी उभारण्याची आवश्यकता आहे. सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रतिक्षायादीमध्ये तक्रारदार यांचा ४९ वा क्रमांक आहे. त्यानुसार तक्रारदार यांना वीज पुरवठा करणेत येईल. प्रथम आलेल्यास प्रथम प्राधान्य या तत्वाप्रमाणे वि.प. कार्यवाही करील असे वि.प. यांचे म्हणजे आहे.

४) सदर प्रकरणाची सुनावणी दि. १४-०३-२०१७ रोजी घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार व त्यांचे प्रतिनिधी हजर नव्हते. तथापि तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे यांनी दूरध्वनीवर संपर्क साधला.

वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री अरुण मोडेकर हजर होते.त्यांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले.

५) तक्रारीचे स्वरुप, वि.प. यांचे निवेदन , उपलब्ध कागदपत्रे आणि तोंडी निवेदन यांचा विचार करता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार नविन घरगुती वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) तक्रारदार हे विलंबाची भरपाई मिळणेस पात्र आहेत काय?

उत्तरः- मागणी सोडून दिली आहे.

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांनी त्यांच्या सर्व्हे क्र.१८१/१ या जमिनीमध्ये घरगुती वीज जोडणी मिळणेसाठी वि.प.कडे रितसर अर्ज सादर करुन दि. १०-०९-२०१३ रोजी रु. १५००/- भरणा केले याबद्दल वाद नाही.त्यांना वीज जोडणी देणेसाठी ०.२४ कि.मी. लघुदाब वाहिनीचा विस्तार करणे आवश्यक आहे असे दिसते. वास्तविक कायदा व नियमानुसार तक्रारदार यांना तीन महिन्यात नविन वीज जोडणी मिळावयास हवी होती. संबंधीत उपविभाग कार्यालय, संख येथे सन २०११-१२ पासूनची प्रतिक्षायादी प्रलंबित आहे. सन २०१३-१४ च्या जेष्ठता यादीमध्ये तक्रारदार यांचा ४९ वा कमांक नमूद आहे.

७) तथापि, विद्युत कायदा २००३ मधील कलम ४३ तसेच मा. वीज नियामक आयोगाने जारी केलेले नियम व निर्देश यांचा विचार करता तक्रारदार यांना निश्चित कालावधीत वीज जोडणी मिळणेचा अधिकार आहे. कृती मानके निनियमानुसार, वितरण कंपनीस जर अडचणी येत असतील तर अशा अडचणी दूर करुन घेण्यासाठी वि.प. यांना मा. आयोगाकडे धाव घ्यावी. लागेल. सारांश , जेष्ठता यादी आहे किंवा निधी उपलब्ध नाही अथवा कंत्राटदार नेमलेला नाही. या आणि अशा प्रकारचा कारणा वरुन तक्रारदार यांचे गा-हाणे नाकारता येणार नाही.

८) सबब, तक्रारदार यांना निश्चत कालावधीत वीज जोडणी देणेत यावी असा आदेश करणे योग्य व न्यायाचे होईल.

९) तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री खापरे यांनी भरपाईची मागणी तक्रारदारतर्फे सोडून देणेत येत आहे असे दूरध्वनीवर स्पष्टपणे सांगितले आहे. त्यामुळे त्याबाबतचा विचार करणेची जरुरी नाही.

शेवटी खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

१) तक्रारदार श्री दत्तु कुंलीक यादव रा. वायफळे ता. जत. जि. सांगली यांना त्यांच्या मागणी अर्जाप्रमाणे घरगुती नविन वीज जोडणी दि. १५.०६.२०१७ पर्यन्त वि.प. यांनी द्यावी असा वि.प. यांना आदेश करणेत येत आहे.

२) तक्रारदारतर्फे विलंबांच्या भरपाईची मागणी सोडून दिली असल्याने ती रद्द करण्यात येत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |